# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पिंजर-बार्शीटाकळी (जि.अकोला) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१) १०२९९ (२०-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी-पिंजर-कारंजा रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे न केल्याने व निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहा महिन्यांमध्ये पिंजर ते बार्शीटाकळी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याची दुरवस्था झाली आहे व सदर खड्डे चुकवितांना श्री.प्रभाकर केदार यांचा अपघात होवून मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली असल्याचेही दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या झालेल्या निकृष्ट दर्जाचे कामाबाबत तेथील माजी ग्रामपंचायत सदस्य पिंजूर ग्रा.पं व बार्शीटाकळी येथील काही राजकीय पक्षाचे कार्यकर्त्यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचेकडे तक्रार निवेदने देऊनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या अपघाताबाबत पोलीस स्टेशन बार्शीटाकळी यांच्या FIR नोंदीनुसार चार चाकी गाडी चालकाने भरधाव वेगाने गाडी चालवून मोटारसायकल स्वारास धडक दिली व त्यामुळे श्री.प्रभाकर केदार यांचा मृत्यू झाला. सदर कार चालक हा दारु पिलेल्या अवस्थेत होता.

तसेच सदर रस्त्याच्या बांधकामामध्ये वापरण्यात आलेले साहित्य जसे की, मुरुम, खडी, सिमेंट व डांबर हे क्वालिटी कंट्रोलच्या मानकाप्रमाणेच आहे. सदर रस्त्याचे प्रत्यक्ष बांधकाम सुरु असताना अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, अमरावती यांनी कामाची पाहणी केली असून, बांधकाम साहित्याच्या गुणवत्तेबाबत कुठलेही प्रतिकूल शेरे नमुद नाहीत. सदर रस्ता संपूर्ण लांबीमध्ये सुस्थितीत असून खड्डे विरहीत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड नगरपरिषद हद्दीतील बिंदुसरा नदीवर पुल कम बंधारा बांधकाम मंजूर करणेबाबत

**(२) १०४१६ (२०-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक १०५२ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड शहराला जोडणारा व शहराच्या मध्यभागातून औरंगाबादकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या बिंदुसरा नदीवर पुल कम बंधारा नसल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत असल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिंदुसरा नदीवर पुल कम बंधारा बांधकाम मंजूर करणेबाबत व त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५/०१/२०२१ रोजी वा त्या सुमारास मा.नगरविकास मंत्री महोदय यांना दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार नगर परिषद, बीड हद्दीतील बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा बांधकाम मंजूर करणेबाबत व त्यासाठी लागणारा आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (१४-१२-२०२१) :** (१) बिंदुसरा नदीवर दोन लेनच्या पूलाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दिनांक ३०/०९/२०१७ रोजी पूर्ण करण्यात आले असून त्यावरुन बीड शहरासाठीची वाहतूक सुरळीत चालू आहे.

यास्तव हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) अशा आशयाचे लोकप्रतिनिधींचे निवेदन उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही.

(३) बिंदुसरा नदीवर चार लेनचा पूल/ ब्रीज कम बंधारा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत बांधण्याच्या अनुषंगाने प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करण्यात येऊन पाहणीअंती सदर पूलाच्या ठिकाणी ब्रीज कम बंधारा बांधणे व्यवहार्य (feasible) नसल्याचे ठरल्याने बिंदुसरा नदीवर दोन लेनचा पूल बांधण्यात आला आहे. तथापि, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत ब्रीज कम बंधारा बांधण्याचे प्रस्तावित नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर कायमस्वरुपी खड्डेमुक्त करण्याबाबत

**(३) १०४३४ (१२-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मागील दोन दशकांमध्ये मुंबईतील नवीन रस्त्यांची दुरुस्ती, देखभाल आणि बांधकामांवर एकूण रुपये २१ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्च केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिका एक खड्डा भरण्यासाठी १७ हजार ते २३ हजार रुपये आकारत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई विकास नियोजन सन १९९१ व सन २०३४ मध्ये सांताक्रुझ पोलीस ठाणे आणि गझर बंद या ठिकाणांना जोडणारे प्रस्तावित दोन बोगदे अद्याप प्रलंबित असल्यामुळे मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे ४० हजार कोटींहून अधिक नुकसान सोसावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या योग्य निर्णय आणि योग्य पध्दतीचा अभाव हे मुंबईतील रस्त्यांवर खड्डे पडण्याचे प्रमुख कारण असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रस्त्याचा दर्जा राखण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखणे अपेक्षित असतानाही महानगरपालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय शहर कायमस्वरुपी खड्डे मुक्त करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) सन २००८ ते २०२१ पर्यंत मुंबईतील रस्ते दुरुस्ती व सुधारणेच्या कामांकरीता रुपये तेरा हजार तीनशे पासष्ट कोटी इतका खर्च करण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरळी स्थित धुम्रजतू संयंत्र येथे उत्पादित केलेले कोल्ड मिक्स महापालिकेच्या २४ प्रशासकीय विभाग कार्यालयात मागणीनुसार पुरविण्यात येते. सदर कोल्ड मिक्सचा वापर पावसाळ्यातील खड्डे बुजविण्यासाठी महापालिकेच्या कामगारांमार्फत करण्यात येतो. या कोल्ड मिक्सद्वारे १ चौ.मी. (खोली ३०-४० मि.मी.) खड्डा बुजविण्याकरीता रुपये २,१००/- ते रुपये २,८००/- इतका खर्च येतो.

दोषदायित्व कालावधीमध्ये अंतर्भूत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे संबंधित कंत्राटदाराकडून भरण्यात येतात व याबद्दल कंत्राटदारास कोणत्याही प्रकारचे अधिदान करण्यात येत नाही.

(३) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४), (५), (६) व (७) मुंबई क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होणारा पाऊस, मुंबई शहराची भौगोलिक स्थिती आणि विविध सेवा उपयोगिता कंपन्यांमार्फत होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणाधर्मानुसार पावसाळ्यात पाण्याच्या संपर्कामुळे खड्डे पडतात.

सदर खड्ड्यांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने सन १९८९ पासून १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरणाद्वारे मजबुतीकरण/ सुधारणा करण्याचे धोरण अवलंबिण्यात आले आहे.

तसेच सन २०२१-२२ पासून ६ मी. पेक्षा जास्त रुंदी असलेल्या रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण टप्याटप्याने करण्याचे महानगरपालिकेने धोरण आखले असून त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. जेणेकरुन भविष्यात जास्तीत जास्त रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करुन भविष्यात खड्डेमुक्त रस्त्यांचे उद्दीष्ट साध्य करता येईल.

स्थायी तांत्रिक सल्लागार समिती (STAC) च्या निर्देशानुसार रस्ते दुरुस्ती व सुधारण्याची कामे करण्यात येतात.

तसेच आवश्यकतेनुसार त्रयस्थ संस्था जसे की, IIT, VJTI, IRC इ. यांचा सल्ला घेतला जातो व रस्त्यांचा दर्जा व गुणावत्ता राखण्याचे काम कसोशीने करण्यात येते. असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## मुंबईतील वांद्रे वर्सोवा सागरी सेतूचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(४) १०४३५ (१७-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-वर्सोवा हे अंतर केवळ दहा मिनिटात पार करता यावे यासाठी वांद्रे-वर्सोवा सागरी मार्ग बांधण्यात येत असून या मार्गाच्या बांधकामासाठी रुपये ७ हजार कोटी खर्च अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील महत्वाकांक्षी वांद्रे-वर्सोवा सागरी मार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून मागील दोन वर्षात केवळ अडीच टक्केच बांधकाम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटदाराला दिवसाकाठी साडेतीन कोटी रुपये दंड ठोठावण्यात आला आहे तसेच सदर कामाचा वेग पाहता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कंत्राटदाराला कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्या नोटीसद्वारे कामाला गती देण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नोटीसीच्या अनुषंगाने सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही करण्यात येत आहे व या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) आतापर्यंत वर्सोवा-वांद्रे सागरी सेतु प्रकल्पाचे २.०७७% इतके किंमतीचे बांधकाम पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यात ५% बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, सदर काम पूर्ण झाले नसल्यामुळे कंत्राटदारास दिनांक ०१/०९/२०२१ पासून प्रकल्प किंमतीच्या ०.०५% प्रति दिवस इतका दंड

आकारण्याचे दिनांक ०७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यानंतर कंत्राटातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत कंत्राटदाराने काम पूर्णपणे बंद केलेले आहे.

---

## उमरखेड ते हिवरखेड (जि.अमरावती) सामाजिक वनीकरण अंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीमध्ये अपहार झाल्याबाबत

**(५) १०४४० (२०-११-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड ते हिवरखेड (जि.अमरावती) सामाजिक वनीकरण अंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीमध्ये हिवरखेडा येथील ग्राम रोजगारसेवक श्री.शेख शकील शेख नूर, श्री फरकडे व वनपाल यांच्या संगनमताने उमरखेड प्लांट दोन वर केलेल्या अपहाराची चौकशी करून कारवाई करणेबाबत विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण उपविभाग, अमरावती यांना जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक ०९/०६/२०२१ रोजी वा त्या सुमारास पत्राद्वारे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण उपविभाग, अमरावती यांनी उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीअंती संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, अमरावती यांनी पत्र क्र. १४२, दिनांक ०१/०६/२०२१ रोजीचे पत्रान्वये विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अमरावती यांना नमूद अपहाराची चौकशी करुन कारवाई करणेबाबत कळविले होते.

(२) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अमरावती यांनी सदर प्रकरणी चौकशी करुन पत्र क्र. /कक्ष/लले/१६०/२०२१-२२ दिनांक २५/०६/२०२१ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार ग्राम रोजगार सेवक, हिवरखेड, श्री.शेख शकील शेख नुर, यांनी

एकूण ३७ मनुष्य दिवसांचे जास्त मजुर लावून जास्तीचा खर्च केल्याचे निदर्शनास आले असल्याने त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविण्यात आले आहे.

(३) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, अमरावती यांनी केलेल्या चौकशीअंती जिल्हाधिकारी, अमरावती यांना संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. सबब, सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

---

## मुंबईतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करित असलेल्या प्रत्येक झोपडीधारकाला घर मिळण्याकरीता कायद्याची अंमलबजवणी करण्याबाबत

**(६) १०४८८ (२०-११-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ६० टक्के लोक झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असून प्रत्येक झोपडपट्टीधारकाला घर मिळावे यासाठी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी सन १९७६ च्या झोपडपट्टी कायद्यात दुरुस्ती करुन प्रत्येकाला घर मिळावे अशी तरतूद केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सन २०१७ च्या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे मुंबईतील बहुतांश एसआरए प्रकल्प प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक झोपडपट्टीधारक हे गत २० ते २५ वर्षे झोपडपट्टीतील पहिल्या मजल्यावर वास्तव्यास असून त्यांच्याकडे संबंधित पुरावेसुध्दा आहेत मात्र एसआरएच्या नियमात तरतुद होत नसल्याने त्यांना बेघर व्हावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य करित असलेल्या प्रत्येक झोपडीधारकाला घर मिळावे यासाठी संबंधित कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१५-१२-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.)(सुधारणा) अधिनियम, २०१७ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

दिनांक ०१ जानेवारी, २०११ पर्यंतच्या असंरक्षित भोगवटादारांसाठी गाळयांच्या उपलब्धतेच्या अधीनतेने त्याच्या मूळ ठिकाणी किंवा अन्यथा, मालकीचे किंवा भाड्याने गाळयांचे वाटप करण्याची तरतूद उक्त सुधारणा अधिनियमान्वये करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने अशा झोपडीधारकांचा निवारा निश्चित करण्याबाबतची कार्यपध्दती दिनांक १६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. सदर विहित कार्यपध्दतीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसनाबाबतचे शासनाचे मूळ धोरण व दिनांक १६/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार झोपडपट्टीतील पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसनास पात्र ठरत नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती (कोल्हापूर) च्या गैरकारभाराबाबत

**(७) १०५८४ (२४-११-२०२१) श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती (कोल्हापूर) च्या कामकाजासंदर्भात गैरव्यवहाराच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेसमवेत झालेल्या बैठकीत या गैरव्यवहारामध्ये भक्ती निवासासाठी खाजगी जागा खरेदी प्रस्ताव, समितीच्या कार्यालयाचे नुतनीकरण, शासनाची परवानगी न घेता करण्यात आलेली नोकर भरती, पुजाऱ्यांची केलेली

नियुक्ती, टेंबलाई मंदिर परिसरात शेड उभारणे, खाजगी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, पॅथॉलॉजी लॅबसाठी जागा या प्रमुख बाबींसह अन्य बाबींचाही तक्रारीचा समावेश सदर निवेदनात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवस्थान समितीच्या गैरव्यवहाराप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर, या समितीच्या कारभाराबाबत तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. तथापि, दिनांक १७/०९/२०२१ रोजीची तक्रार अप्राप्त आहे.
(२) होय, हे खरे आहे.

श्री.प्रमोद दत्ताजी सावंत व इतर यांचा दिनांक १३/०९/२०२१ रोजीचा तक्रार अर्ज जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक १६/०९/२०२१ रोजी सुनावणी झालेली आहे. तक्रारदाराने केलेल्या सदर तक्रारीतील काही मुद्दे यापूर्वी शासनास प्राप्त झालेल्या तक्रारीत आहेत.
(३) शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने देवस्थान व्यवस्थापन समिती पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील ऐवजदार सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत

**(८) १०६३७ (१३-११-२०२१) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ६७९८ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार नागपूर महानगरपालिकेत २० वर्षांपेक्षा जास्त वर्षांपासून कार्यरत असलेल्या ४४०७ हजार सफाई कामगारांची सेवा स्थायी करण्याचे निर्देश असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त/ मृतक झाल्यास त्यांच्या वारसदारांना लाड कमिटी अंतर्गत नोकरी देण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऐवजदार व त्यांच्या वारसांचे प्रश्न सोडवण्यासाठी शासन स्तरावर उच्चस्तरीय बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) राज्य शासनाचे शासन निर्णय २० सप्टेंबर, २०१९ अन्वये मूळ ऐवजदार कार्ड असलेल्या आणि २० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या ४४०७ सफाई कामगारांची अधिसंख्य पदे निर्मित करून त्यांना नागपूर महानगरपालिकेत सामावून घेणेकरीता मान्यता दिली असून अनुषंगिक कार्यवाही नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक २० सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांबाबत सर्वसमावेशक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार नागपूर महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## नागपूर सुधार प्रन्यासमध्ये भूखंड नियमितीकरणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९) १०६३८ (०६-१२-२०२१) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ९३७३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एनआयटीच्या माध्यमातून गुंठेवारी कायद्यानुसार सुरू असणाऱ्या नियमितीकरणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून अनधिकृतपणे बॅक डेट मध्ये स्टॅम्प पेपर घेऊन जमीन मालक व भूखंडधारक यांचे खोटे करार दाखवून भूखंड वाटप करण्यात आल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यास मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेचे ऑडिट व चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, गुंठेवारी कायद्यान्वये अंमलबजावणी करत भूखंड अद्याप मोकळे का आहेत याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी विचारणा केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगांव (ता.पाटोदा, जि.बीड) येथील सुप्रसिध्द मयुर अभयारण्यात वन्यजीवांना पोषक झाडे लावण्याबाबत

**(१०) १०७१० (०६-१२-२०२१) श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक ७३८८ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगांव (ता.पाटोदा, जि.बीड) येथील सुप्रसिध्द मयुर अभयारण्यात सन २०१८-२०१९ च्या मोजणीनुसार मोरांची संख्या ८५०० इतकी असल्याचे तसेच इतर वन्य पशुपक्षीही मोठ्या प्रमाणावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभयारण्य क्षेत्रामध्ये ग्लिरीसिदीया (उंदीरमारी) या झाडांची संख्या लक्षणीय असून ते अत्यंत विषारी असल्याने परिणामी मोर व अन्य वन्यजीव यांची प्रजनन शक्ती कमी झाल्याचे तसेच मोरांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन्यजीवांना वाचविण्यासाठी ही झाडे नष्ट करुन त्याजागी वन्यजीवांना पोषक वड, पिंपळ, बेहडा, करवंद, बिबा, टेंभूर्णी, उंबर, चिंच, धामोडा यांसारख्या वृक्षांची लागवड करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मयुर अभयारण्याच्या व्यवस्थापन आराखड्यामध्ये अभयारण्यातुन ग्लिरीसिदीया ही वनस्पती नष्ट करण्याची बाब अंतर्भुत करुन त्याजागी वन्यजीव पोषक झाडे लावून वन्यजीवसृष्टी वाचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-१२-२०२१) :** (१) सन २०१९ च्या पक्षी गणनेनुसार नायगाव मयुर अभयारण्यातील मोरांची संख्या ८२०३ इतकी नोंदविण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) नायगाव मयुर अभयारण्याच्या मंजूर व्यवस्थापन आराखड्यामध्ये ग्लिरीसिडीया वनस्पती काढून त्याजागी इतर वन्यजीव पोषक झाडे लावण्याची बाब अंतर्भुत नसल्याने ग्लिरीसिडीयाची झाडे काढण्यात आलेली नाहीत.

तथापि, अभयारण्यातील ग्लिरीसिडीयाचे निर्मुलन करुन त्या पश्चात घ्यावयाच्या रोपवन कार्यक्रमाबाबत अभ्यास करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंब्रा-दिवा खाडी (जि.ठाणे) परिसरात खारफुटीची वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(११) १०७१७ (२०-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-दिवा खाडी (जि.ठाणे) परिसरात काही भूमाफियांनी देसाई खाडीत भराव टाकून मुंब्रा ते दिवा असा जोडणारा सुमारे २ किमी अंतराचा रस्ता बेकायदेशीररित्या खारफुटीची वृक्षतोड केल्याबाबत तेथील पर्यावरणप्रेमींनी मा.पर्यावरणमंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे, जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, ठाणे व आदिंकडे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमाफियांना खाडीत भराव टाकून एवढया मोठ्या प्रमाणावर खारफुटीची वृक्षतोड करून मुंब्रा-दिवा असा सुमारे २ किमी अंतराचा रस्ता तयार करित असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून या प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पर्यावरणप्रेमींनी माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान तहसिलदार, ठाणे यांच्याकडे तक्रारी केलेल्या असता सदर प्रकरणी केवळ जागा मालकांना नोटिस बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू भूमाफियांविरोधात आजमितीस कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरहू गुन्हेगारांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंब्रा-दिवा खाडी (जि.ठाणे) परिसरात काही भूमाफियांनी देसाई खाडीत भराव टाकुन मुंब्रा ते दिवा असा जोडणारा सुमारे २ किमी अंतराचा रस्ता बेकायदेशीररित्या खारफुटीची कत्तल केल्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे, तहसिलदार ठाणे यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार प्राप्त झाली आहे.

तसेच मौजे मुंब्रा येथील खारफुटीच्या कत्तल झाल्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदरहू भूमाफियाविरोधात मंडळ अधिकारी, मुंब्रा यांच्यामार्फत पुढीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१. रेती उपसा प्रकरणी गु.र.जि.क्र.११४७/२०१९, दिनांक २५/१२/२०१९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
२. कांदळवन ऱ्हास केले प्रकरणी गु.र.जि.क्र.००२४/२०२०, दिनांक ७/०१/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
३. रेती उपसा प्रकरणी गु.र.जि.क्र.००५६/२०२०, दिनांक १३/०१/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
४. रेती उपसा प्रकरणी गु.र.जि.क्र.०६९०/२०२०, दिनांक १९/०८/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
५. गु.र.जि.क्र.०५९५/२०२१, दिनांक २२/०६/२०२१ रोजी गुन्हा दाखल केला आहे.
६. तसेच प्रकरणी मुंबई कांदळवन संधारण घटक या कार्यालयामार्फत दिनांक २३/०८/२०२१ रोजी भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१), (ए), (डी), (एच) अन्वये वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील महापे ग्रामस्थांच्या पाण्याच्या समस्या सोडविण्याबाबत

**(१२) १०७५४ (०९-१२-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत एमआयडीसीकडून पाणीपुरवठा होत असून महापे गावातील जलवाहिनी पाच दिवसात चार वेळा फुटल्याने सलग पाच दिवस पाणीपुरवठा खंडित झाल्याने व वेळेवर पाणीपुरवठा न झाल्याने लोकांना पाणी विकत घेण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापे गाव हे नवी मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये येत नसल्याने महापे गावाला महानगरपालिका पाणीपुरवठा करत नसून परंतु एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो, परंतु तो कमी दाबाने, कमी वेळासाठी होत असल्यामुळे पाण्याची समस्या गेल्या अनेक वर्षापासून आहे याबाबत महानगरपालिका आणि एमआयडीसी एकमेकांवर आरोप करीत असल्याने महापे गाव कोणत्या हद्दीत येत आहे अशी तक्रार ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापे गावातील लोकसंख्या वाढल्यामुळे पाणी वापराचे प्रमाणही वाढले आहे त्यानुषंगाने पाणीपुरवठा करण्याची वेळ वाढविण्यात यावी, अशी मागणी महापे ग्रामस्थानी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबईतील महापे गावातील ग्रामस्थांच्या पाण्याबाबतच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) डोंबिवली, नवी मुंबई, ठाणे व मिरा-भाईंदर या शहरांना बारवी धरणातून पाणीपुरवठा करणारी एमआयडीसीची मुख्य जलवाहिनी जीर्ण झाल्याने चार वेळा फुटल्यामुळे वेळेवर पाणीपुरवठा झाला नाही.

या कालावधीत महापे गावातील नागरिकांना नवी मुंबई महानगरपालिकेने मागणीनुसार टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा केला, ही वस्तुस्थिती आहे.

(२) महापे गाव नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील औद्योगिक क्षेत्रात असून, या ठिकाणी एमआयडीसीच्या जलवाहिनीतून पाणीपुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत मोरबे धरणातून पाणीपुरवठा करणेसाठी नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे.

या जलवाहिनीमुळे महापे गावातील नागरिकांच्या पाण्याची समस्या सुटणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील उरण येथील जे.एन.पी.टी. प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१३) १०७८३ (१२-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील उरण येथील जे.एन.पी.टी. प्रकल्पामध्ये बाधित झालेल्या हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन शासनाने केले नसल्याची बाब माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी व बाधित झालेल्या रहिवाशांनी वारंवार तक्रार करुनही शासनाने अद्यापपर्यंत दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार हनुमान कोळीवाड्याचे पुनर्वसन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-११-२०२१) :** (१), (२), (३) न्हावा शेवा बंदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या न्हावा-शेवा गावातील प्रकल्पग्रस्तांचे फेरपुनर्वसनासाठी नव्याने जमीन उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जे.एन.पी.टी. ला देण्याची विनंती मा.मंत्री (केंद्रीय (पोत व परिवहन मंत्रालय) यांना दिनांक ०४/०५/२०१७ व दिनांक २९/०३/२०१९ च्या पत्रानुसार करण्यात आली आहे. तसेच मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २४/११/२०२० रोजीच्या बैठकीमध्ये जे.एन.पी.टी. ने हनुमान कोळीवाडा (शेवा कोळीवाडा) चे पुनर्वसन करावयाचे असल्याने पुनर्वसनाचा सकारात्मक प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करुन पाठपुरावा करण्याचे जे.एन.पी.टी ला निर्देश दिलेले आहेत.

पुनर्वसनाच्या अनुषंगाने उरण तालुक्यातील ३ ठिकाणच्या जागेच्या पाहणी अहवाल उपविभागीय अधिकारी, उरण यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक १७/०३/२०२१ रोजी सादर केला आहे. जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक १७/११/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये जे.एन.पी.टी.ला मूळ प्रस्तावामध्ये आवश्यक सुचना/ बदल सुचवून पुनर्वसनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले असून जिल्हाधिकारी, रायगड व जे.एन.पी.टी. यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेने आरक्षित भूखंडावर बांधलेल्या गाळ्याचे वाटप आदिवासी बांधवांना करण्याबाबत

**(१४) १०८०७ (१३-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेने रुपये ३७ लाख खर्चून खंडेराव मंदिराच्या जवळील आरक्षित भूखंडावर गाळे बांधले परंतु त्यांचे मागील दहा वर्षात वाटप झाले नसल्याकारणाने येथील आदिवासी बांधव हक्काच्या रोजगारापासून वंचित राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गाळ्यांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे वाटप आदिवासी बांधवांना द्यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व आदिवासी बांधवांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार गाळ्यांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे वाटप आदिवासी बांधवांना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) आदिवासी उपयोजनेंतर्गत जव्हार नगरपरिषदेने बांधलेल्या गाळयांचे अदयापपर्यंत वाटप झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) अशा आशयाची निवेदने जव्हार नगरपरिषदेकडे प्राप्त झाली आहेत, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३) जव्हार नगरपरिषदेने राबविलेल्या निविदा प्रक्रियेस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे नापरतावा अधिमुल्य कमी करण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

सदर गाळयांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन त्याचे वाटप संबंधितांना तातडीने करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, पालघर यांना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भाईंदर पश्चिमेकडील खाडी गावात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) १०८१० (१३-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर महानगरपालिकेने खाडी गावात दोन वर्षापूवी लाखो रुपये खर्च करुन पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकली आहे परंतु पंप हाऊस बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने स्थानिक नागरिक पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाडी गावात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व खाडी ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार खाडी गावात पिण्याचे पाणी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२१) :** (१) • मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथील खाडीवर तांत्रिकरित्या पाण्याची जलवाहिनी सुरळीत सुरू आहे.

• सदर ठिकाणी गुरूत्ववाहिनीद्वारे पाणीपुरवठा करता येत असल्याने पंप हाऊस बांधण्याची आवश्यकता नाही.

• स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागते, हे वस्तुस्थितीस धरून नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) • खाडीवर या परिसरात केशवसृष्टी पासून १.२ कि.मी. अंतराची १५० मि.मी. व १०० मि.मी. व्यासाची मिळून जलवाहिनी अंथरण्यात आलेली आहे.

• सदर जलवाहिनीचे वॉश आऊट व चाचणी करून जलवाहिनीवरील दाब योग्य असल्याची तपासणी करण्यात आलेली असून, सद्य:स्थितीत जलवाहिनी कार्यान्वित आहे.

(४) • काही रहिवाश्यांचे जलजोडणी मिळणेबाबत ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्याने, या ठिकाणी पाच जलजोडणी आदेश मंजूर करण्यात आलेले आहेत.

• तथापि, अर्जदारांनी नवीन जलजोडणी शुल्क भरणा न केल्याने त्यांच्या मालमत्तेस नळजोडणी जोडण्यात आली नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(१६) १०८२१ (१३-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात स्वत:ची अग्निशमन यंत्रणा नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलासाठी नियोजन समितीने लाखो रुपयांचा निधी मंजूर करुनही फायर स्टेशनसाठी जागा मिळत नसल्याने हा प्रस्ताव मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर तालुक्यात अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहापूर तालुक्यात अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) शहापूर नगरपंचायतीकडे स्वत:ची अग्निशमन यंत्रणा नाही, ही वस्तूस्थिती आहे.
(२) अग्निशमन वाहन (Quick Response Vehicle) खरेदीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी प्राप्त झाला असून यासंदर्भातील निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे. तसेच, सद्य:स्थितीत नगरपंचायतीकडे अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध नाही, ही देखील वस्तूस्थिती आहे.
(३) अशा आशयाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शहापूर नगरपंचायतीकडे केली आहे, हे खरे आहे.
(४) अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याची कार्यवाही नगरपंचायतस्तरावर सुरु असल्याचे शहापूर नगरपंचायतीने कळविले आहे.

तसेच, महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा अभियानांतर्गतसुध्दा शहापूर नगरपंचायतीस अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहन उपलब्ध करुन देण्यात येणार असून त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सुरु असल्याचे महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटकोपर (पूर्व) पारशीवाडी येथील जय महाराष्ट्र गणेश मैदानाच्या नुतनीकरणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) १०८४२ (०३-१२-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (पूर्व) येथील एन विभागातील प्रभाग क्र.१२९ मधील जय महाराष्ट्र गणेश मैदान, पारशीवाडी येथील मैदानाच्या नुतनीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने निरमा कंस्ट्रक्शन या कंपनीला दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मैदानाचे नुतनीकरण करण्याची निविदा प्रक्रिया केव्हा पार पाडण्यात आली,
(३) असल्यास, ठेकेदाराने सदर काम निकृष्ट दर्जाचे करून सहाय्यक उद्यान अधीक्षक व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन लाखो रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदर अधिकारी तथा ठेकेदाराविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर मैदानाचे नुतनीकरण करण्याची निविदा प्रक्रिया सन २०१९ मध्ये पार पाडण्यात आली.
(३) व (४) सदर कामाच्या व्याप्तीनुसार ठेकेदार मे. निरमा कन्स्ट्रक्शन यांनी समाधानकारकरित्या काम पूर्ण केल्याची खात्री करुनच त्यांना अधिदान करण्यात आले आहे.

तसेच सदर कामात कोणतीही अनियमितता अथवा गैरव्यवहार झालेला नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा व सेवानिवृत्ती विषयक लाभाबाबतच्या अहवालाबाबत

**(१८) ११२१७ (१९-११-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीसाठीच्या राखीव जागांवर सेवेत रुजू झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा व सेवानिवृत्ती विषयी दिनांक १५ जून, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या अभ्यासगटाने ३ महिन्यात शिफारशीसह अहवाल सादर करण्याचे निर्देश शासनाने दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अभ्यासगटाने अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांवर सेवेत रूजू झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा व सेवानिवृत्ती विषयक लाभाबाबत अहवाल अद्यापही अप्राप्त असून सदर अहवाल शासनास सादर करावा याकरीता कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे कोणती?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक २२/०९/२०२१ रोजी अभ्यास गटाची अंतिम बैठक पार पडली असून, अभ्यास गटाचा अहवाल लवकरच शासनास प्राप्त होईल.

---

## राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पावसामुळे राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९) ११४११ (१३-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात झालेल्या अतिवृष्टी व पावसामुळे राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील रस्त्यांवर खड्डेपडून अतिशय बिकट अवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील खडड्यांच्या दुरुस्ती व उपाययोजनेबाबत आढावा बैठक घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील बैठकीत कोणता निर्णय घेण्यात आला त्यानुसार रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (०१-१२-२०२१)** : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदर बाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९/०९/२०२१ रोजी सर्व संबंधितांची आढावा बैठक घेण्यात आली.

(३) सदर बैठकीत सर्व राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील खड्डे तात्काळ भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले.

त्याअनुषंगाने राष्ट्रीय महामार्गांवरील तात्काळ आवश्यक ती दुरुस्ती करुन वाहतूक पूर्ववत करण्यात आली व कायमस्वरुपी दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच कंत्राटदाराच्या दोष निवारण कालावधीतील लांबी त्यांच्या खर्चाने दुरुस्त करण्यात येऊन सद्य:स्थितीत वाहतूक सुस्थितीत ठेवण्यात आली आहे

तसेच बहुतांशी राज्य महामार्गांवरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत व काही ठिकाणी खड्डे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

**(२०) ११६०५ (०६-१२-२०२१)** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेने युध्दपातळीवर कारवाई करावी अशा सूचना शासनाने महानगरपालिकेला केल्या असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील पूर्व आणि पश्चिम महामार्गालगत मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकले जाते असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या सूचनांनूसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) मुंबईतील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेने युध्दपातळीवर कारवाई करावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीदरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिले आहेत.
(२) मुंबई शहरात कुठेही डेब्रीज टाकलेले आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर डेब्रीज त्वरीत उचलले जाते. तसेच, अनधिकृतरित्या डेब्रिज टाकतांना प्रत्यक्ष आढळल्यास उपद्रव शोधकांमार्फत दंडात्मक कारवाई केली जाते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) आरईटीएमएस या संगणक प्रणालीतील नोंदीनुसार दिनांक ०१/०३/२०१६ ते ०३/१२/२०२१ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागांमध्ये एकूण ६७,८२५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

- ३२,७६८ अनधिकृत बांधकामांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.
- कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन ८३२६ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.
- उर्वरित प्रकरणांमध्ये पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु असून, कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर अनधिकृत बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात येणार आहेत व त्याबाबतची माहिती आरटीईएमएस संगणक प्रणालीत महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तक्रारी या शीर्षकाखाली “रिमूव्हल ऑफ इनक्रोचमेंट” येथे पाहता येणार आहे.

- तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते.

मा.उच्च न्यायालयात दाखल सुमोटो रिट पिटीशन क्रमांक (एसटी) ९३४३२/२०२० व सुमोटो जनहित याचिका क्रमांक ०१/२०२१ मधील आदेशानुसार कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर अनधिकृत बांधकामांवरील निष्कासन कारवाईस स्थगिती देण्यात आली होती.

तथापि, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ पासून अनधिकृत बांधकामांवर पोलीस बंदोबस्ताच्या उपलब्धतेनुसार निष्कासन कारवाई सुरु करण्यात आली असून, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या संपामुळे पोलीसबळ उपलब्ध न झाल्यामुळे निष्कासन कारवाई प्रभावित झाली होती. नियमित पोलीसबळ प्राप्त झाल्यानंतर निष्कासन कारवाई जोमाने सुरु करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.